आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२ डिसेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अदानी लाचखोरी, संभल हिंसाचार आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधकांचा संसदेत गदारोळ/ दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- नोव्हेंबर २०२४मधे वस्तू आणि सेवा कर संकलनात साडेआठ टक्के वाढ

- येत्या दहा वर्षांत भारतीय नौदलात आणखी  ९६ जहाजं आणि पाणबुड्या दाखल होणार

**आणि**

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदान यंत्रांत छेडछाड झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा मुख्य  निवडणूक अधिकाऱ्यांचा इशारा

**<><><><><>**

अदानी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण आणि संभलमधल्या हिंसाचारासह विविध मुद्द्यांवरून आजही दोन्ही सभागृहात गदारोळ झाल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी अदानी, संभल आणि मणिपूर या मुद्द्यांवर चर्चेची मागणी केली. सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू केल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली. गोंधळ सुरूच राहिल्याने सभापतींनी कामकाज आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेतही याच मुद्द्यांवरून विरोधकांनी दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे

राज्यसभेतही गदारोळ सुरू झाला. अध्यक्षांनी चर्चा करण्याची विनंती करूनही गोंधळ सुरूच राहिल्याने त्यांनी सभागृहाचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

संसदेत घोषणाबाजी करून कामकाजात अडथळे आणल्याबद्दल केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी विरोधकांवर टीका केली आहे. अशा प्रकारची अडवणूक म्हणजे जनतेच्या पैशाची उधळपट्टी असल्याचा आरोपही सिंह यांनी केला आहे. संसद सदनाबाहेर ते माध्यमांशी बोलत होते. दरम्यान, अदानी प्रकरणासह विविध मुद्यांवर विरोधकांनी केलेले स्थगन प्रस्ताव सरकारने स्वीकारले नाहीत. कारण केंद्राला या मुद्द्यांवर चर्चा करायची नसल्याचा प्रत्यारोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनिष तिवारी यांनी केला आहे.

**<><><><><>**

देशात नोव्हेंबरमध्ये वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी संकलन १ लाख ८२ हजार कोटी रुपये झालं आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत त्यात साडेआठ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये एकूण १लाख ६८ हजार कोटी रुपये जीएसटी जमा झाला होता. सरकारनं काल ही आकडेवारी जाहीर केली. यंदाच्या नोव्हेंबरमध्ये जमा झालेल्या एकूण जीएसटी मध्ये केंद्रीय जीएसटी संकलन ३४ हजार १४१कोटी रुपये, राज्य जीएसटी ४३ हजार ४७ कोटी रुपये, एकात्मिक जीएसटी ९१ हजार ८२८ कोटी रुपये तर उपकर १३ हजार २५३ कोटी रुपये आहे.

**<><><><><>**

देशातल्या कोळसा खाणींमधून गेल्या ८ महिन्यांत ११ कोटी २० लाख टन इतकं उत्पादन झाल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्रालयाने दिली आहे. गेल्या वर्षी याच

कालावधीत झालेल्या उत्पादनाच्या तुलनेत यंदा ३५ टक्क्यांची वाढ झाली आहे. नोव्हेंबर महिन्यात त्यात आणखी १ कोटी ७० लाख टन कोळशाची भर पडली आहे. देशांतर्गत उर्जा निर्मितीला प्राधान्य देऊन सरकार भारताला पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने पुढे घेऊन जात असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातल्या विकसित भारत २०४७ मधलं ते पुढचं पाऊल आहे, असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआयद्वारे या वर्षी ऑक्टोबरमध्ये १६ अब्ज ५८ कोटींहून अधिक व्यवहार झाले आहेत. या व्यवहारांमधे सुमारे २३ कोटी ४९ लाख रुपयांची देवाण घेवाण झाली. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत यात ४५ टक्के वाढ झाली आहे. अर्थ मंत्रालयानं काल ही आकडेवारी जाहीर केली. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं २०१६ मध्ये ही सुविधा दाखल केली. यात अनेक बँक खाती एकाच मोबाईल ॲपमध्ये सामायिक करून डिजिटल पद्धतीनं आर्थिक व्यवहार करणं सहजशक्य झालं आहे. यामुळं रोखविरहित अर्थव्यवस्थेकडे देशाची वाटचाल सुरू आहे. या पेमेंट इंटरफेस आंतरराष्ट्रीय पातळीवरही पसंती मिळाली असून संयुक्त अरब अमिराती, सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशस अशा सात देशांमध्येही ही सुविधा वापरली जात आहे.

<><><><><>

जगभरात प्लॅस्टिक प्रदूषणाचं आव्हान गंभीर होत असून त्याचा विपरीत परिणाम अर्थव्यवस्थांवर विशेषत: विकसनशील अर्थव्यवस्थांवर होत आहे. त्यामुळं प्लॅस्टिक प्रदूषण आणि शाश्वत विकास यात संतुलन राखण्याची गरज आहे. त्यासाठी सर्व देशांनी परस्परविश्वास आणि सामंजस्यानं उपाययोजना करण्याचं आवाहन भारतानं दक्षिण कोरियात बुसान इथं आंतरसरकारी वाटाघाटी समितीच्या

पाचव्या सत्राच्या अंतिम सभेत केलं आहे. प्लॅस्टिक पॉलिमरच्या उत्पादनाचं नियमन करण्यासाठी कोणत्याही उपाययोजनांना पाठिंबा देण्यास आपण असमर्थ असल्याचं भारतानं स्पष्ट केलं. यामुळे समितीच्या सदस्य देशांच्या विकासाच्या अधिकारावर मोठा परिणाम होऊ शकतो, असं भारतानं म्हटलं आहे. विकसनशील देशांना नियमपालनाच्या जबाबदारीसाठी वाढीव खर्चाची पूर्तता करण्यासाठी स्वतंत्र बहुपक्षीय निधीची गरज असल्याचंही भारतानं अधोरेखित केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत. भोपाळमधे झालेल्या युनियन कार्बाईड विषारी वायू दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस म्हणून पाळला जातो. ही दुर्घटना ३ डिसेंबर १९८४ रोजी घडली होती.

**<><><><><>**

येत्या दहा वर्षांत भारतीय नौदलात ९६ जहाज आणि पाणबुड्या सामील केल्या जातील असं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी सांगितलं. ६२ जहाज आणि एक पाणबुडी निर्माणाधिन असून पुढच्या वर्षापर्यंत प्रत्येक महिन्यात एक जहाज नौदलात सामील करून घेतलं जाईल असं त्रिपाठी म्हणाले. वार्षिक नौदल दिवसाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. ४ डिसेंबर रोजी ओदिशातल्या पुरी इथं नौदल दिवस साजरा केला जाईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल, असं त्रिपाठी यांनी सांगितलं. भारत  हा शेजारी देशांपासून होणाऱ्या संभाव्य धोक्याला तोंड देण्यासाठी  पूर्णपणे सज्ज आहे, असंही त्यांनी यावेळी  सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोकलिंगम यांनी दिला आहे. ईव्हीएम गैरव्यवहारांबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीच्या नेत्यांकडून सतत आरोप केले जात आहेत, त्याचवेळी चोकलिंगम यांनी हे विधान केलं आहे. या प्रकरणी अधिकारी सखोल तपास करत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं. परदेशात वास्तव्यास असलेल्या आणि ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करणारी पत्रं पाठवणाऱ्या सय्यद शुजा यांच्या विरोधात निवडणूक आयोगानं गुन्हा दाखल केला आहे,असंही चोकलिंगम यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात सरकारस्थापनेच्या दृष्टीनं महायुतीच्या घटक पक्षांमधे आजपासून वाटाघाटी पुन्हा सुरु होतील. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रकृती अस्वास्थ्यामुळे विश्रांतीकरता गावी गेले होते, ते परतले असून आता आपली प्रकृती ठीक असून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा घेतील असं काल त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगीतलं.

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बेैठक झाल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान येत्या गुरुवारी ५ डिसेंबरला आझाद मैदानावर महायुती सरकारचा शपथविधी होणार असून त्यादृष्टीनं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर नेत्यांनी आज आझाद मैदानाची पाहणी केली.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येणार आहेत. यावेळी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी उपक्रमांचा आरंभ करण्यात येणार आहे. सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन श्रेणीतील वैयक्तिक उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार पूर्ण अंधत्व असलेले कायदेतज्ज्ञ ॲडव्होकेट अमर जैन आणि ७५ टक्के अपंगत्व असलेले प्रतीक खंडेलवाल यांना देण्यात येणार आहे. प्रतीक खंडेलवाल यांनी शहरांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक सुविधा उभारण्यात मदत करण्यासाठी 'रॅम्प माय सिटी' हे स्टार्ट-अप सुरू केलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष या नात्याने जो बायडेन यांनी पुत्र हंटर बायडेन यांना माफी दिली आहे. बेकायदा शस्त्र बाळगणे आणि करविषयक गुन्ह्यांबाबत खोटी प्रतिज्ञापत्र दाखल केल्याच्या आरोपाखाली हंटर बायडेन यांना दोषी ठरविण्यात आलं आहे. हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचं बायडेन यांनी एका अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या माफीचा निषेध केला आहे. हा न्यायव्यवस्थेचा भंग असल्याचं म्हटलं असून ६ जानेवारीच्या कॅपिटल दंगलखोरांसारख्या इतरांनाही अशीच माफी मिळेल, का असा सवाल केला आहे.

**//<><><><><>//**